Regd. No. MH323/2012

# Agro Inputs Manufacturers Association (of india)

जा. क्र. AIM 2014/15/005 दि. २२/०७/२०१४

प्रति,
मा. कृषी आयुक्त,
कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र शासन,
मध्यवर्तीभवन, पुणे

विषय :- बिगर नोंदणीकृत कृषी निविष्ठा निर्मिती व विक्री बाबत...

संदर्भ : १. जा.क्र./पसना/अ.उ./१७८१/२०१४ कार्यालय पंचायत समिती नांदेड यांचे दिनांक १८/७/२०१४ चे पत्र
२. जा.क्र./ पं. संख्या/कृषी/१८००/२०१४ कार्यालय पंचायत समिती लोहा यांचे दि. ११-०७-२०१४ कार्यालय चे पत्र
३. कॅम्प मासवा सोनखेड यांचे जा.क्र. वैगेर उल्लेख नसलेले दि. १०-७-२०१४ चे पत्र

महोदय,

वरिल संदर्भीय पत्राच्या अनुंषगाने आपणास विनंतीपूर्वक निवेदन करीत आहोत की, आम्ही स्वयंसंशोधित कृषी निविष्ठा उत्पादक ॲग्रो इन्पुटस् मॅन्यूपॅक्चरर्स असोसिएशनचे नावाने शासकीय नोंदणीकृत संघटना स्थापन करुन मागील चार वर्षापासून आपल्या खात्यातील अशा प्रकारच्या उत्पादनास परवाना घेणे संदर्भात गठीत केलेल्या समितीच्या सहकार्याने संबधित उत्पादकांना परवाने मिळणे संदर्भात कार्य करीत आहोत.

त्याचप्रमाणे आपल्या सहमतीने आम्ही अशा प्रकारच्या उत्पादनाचे आपण सुचीत केलेल्या विद्यापिठामध्ये चाचण्या घेण्याचे काम करीत आहोत. तसेच आपण ठरवून दिलेल्या सर्व अटीची पूर्तता करण्यासंदर्भात आमच्या असोसिएशनमधील सभासदांना मार्गदर्शन करीत आहोत. त्याप्रमाणे आमच्या पैकी बऱ्याच सभासदांनी त्यांची स्वतःची प्रयोगशाळा उभारली असून उत्पादनाच्या चाचण्या (Trial Data) व्यतिरिक्त इतर सर्व अटीची पूर्तता बऱ्याचशा सभासदांनी केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे विविध बिगरनोंदणीकृत उत्पादनाच्या चाचण्या (Trial) राज्यातील तीन कृषी विद्यापीठामध्ये घेण्याचे काम चालू आहे.

अशा प्रकारे हे संपूर्ण कामकाज सुरुळीत चालू असताना आपल्या राज्यातील काही जिल्ह्यातील ADO व तालुका कृषी अधिकाऱ्यामार्फत कृषिनिविष्ठा विक्रेत्यांना अशा प्रकारचे उत्पादनाची साठवणूक व विक्री करु नये, अशी आदेशाचे पत्र देण्यात येत आहे, तसेच त्यांच्याकडुन १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवरती अशा प्रकारचे उत्पादनाची साठवणूक आणि विक्री करणार नाही, असे हमीपत्र लिहून घेण्यात येत आहे. या अशा प्रकारच्या अचानक केलेल्या कारवाईमुळे ऐन मोसमामध्ये विक्रेत्यांमध्ये घबराट निर्माण झाली आहे. तसेच या नियमांचे उल्लंघन केल्यास विक्रेत्यांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल, अशी समज देण्यात येत आहे. या सर्व प्रकारामुळे सर्व विक्रेते उत्पादकांकडे त्यांचा माल परत घेऊन जाण्यास सांगत आहेत.

वरिल घटनेकडे लक्ष वेधून आम्ही आपणास विनंती करीत आहोत, अशा प्रकारे कुठलीही पूर्वसुचना न देता आपल्या खात्यातील अधिकारी अशा प्रकारची टोकाची भूमिका घेत आहेत. त्यामुळे आमच्या उत्पादकाचे

आतोनात नुकसान होणार आहे. कारण आम्ही विक्रेत्यांना विकलेल्या उत्पादनाचे पेमेन्ट विक्रेत्यांकडून येणे आहेत. काही विक्रेत्यांने दिलेले पेमेन्ट आम्ही वेगवेगळ्या कारणासाठी खर्च केलेले आहेत. जर विक्रेत्यांनी आमची उत्पादने परत पाठवले तर आमचे येणारे पेमेन्ट बुडणार आहेत. तसेच आमची इंडस्ट्री धोक्यात येणार आहे. आम्ही तयार करत असलेली उत्पादने ही शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन वाढविण्यास व पिकाचा दर्जा सुधारण्यास अत्यंत उपयुक्त व आवश्यक असल्याने शेतकऱ्यांकडुन अशा उत्पादनास खूप मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

आमच्या या उत्पादनामुळे नुकसान झाल्याच्या कुठल्याही शेतकऱ्यांकडून आम्हाला तक्रार आलेली नसतांना आपल्या खात्याचे अधिकारी अशा प्रकारची कारवाई कशाच्या आधारावर व कोणत्या नियमाअंतर्गत करत आहेत, याची आम्हाला माहिती द्यावी, तसेच अशा प्रकारची कारवाई ताबडतोब थांबविण्याच्या सुचना आपण आपल्या खात्यातील सबंधित अधिकाऱ्यांना द्याव्यात. तसेच संपूर्ण राज्यातील अधिकाऱ्यांना अशा प्रकारे विक्रेत्यांची व उत्पादकांची अडवणूक करु नये, अशा प्रकारचा आदेश आपण द्यावा, अशी आम्ही आपणास विनंती करीत आहोत.

कृपया आपण सदर पत्राची ताबडतोब दखल घ्यावी व याबात नियमानुसार अंमलबजावणी करावी, अशी आम्ही आपणास विनंती करीत आहोत.

धन्यवाद.

सोबत :- नांदेड जिल्हयामध्ये तालुका स्थित कृषी अधिकाऱ्यांने कृषी निविष्ठा विक्रेत्यांना दिलेल्या विविध पत्राचे झेरॉक्स प्रत.

प्रत :- मा. झेंडे साहेब, मुख्य गुणवत्ता अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती भवन, पुणे.

आपले विश्वासू ,

राजकुमार धुरगुडे पाटील
अध्यक्ष
ॲग्रो इन्पुटस् मॅन्यूफॅक्चरर्स असोसिएशन
(ऑफ इंडिया)